# लोक महाविद्यालय, वर्धा
## विषय :– समाजशास्त्र 2018–19
## वर्ग :– बी.ए. भाग–2 (Semi.-III)
## Study Material :– मुलभूत समाजशास्त्रीय विचार

प्रश्न :– मॅक्स वेबर यांचा सामाजिक क्रियेचा सिध्दांत स्पष्ट करा.

उत्तर :– **जीवन परिचय :–**

मॅक्स वेबरचा जन्म 21 एप्रिल 1864 मध्ये जर्मनीमधील इरफूर्ट या गावी एका श्रीमंत कुटूंबात झाला. वेबरने वयाच्या अठराव्या वर्षी हॅडेलबर्ग विद्यापीठात कायद्याच्या अभ्यास करण्याकरिता प्रवेश घेतला. कायद्याप्रमाणेच इतिहास, तत्वज्ञान, अर्थशास्त्र इत्यादी विषयाचे सुध्दा त्याने अध्ययन केले.

कायद्याचा अभ्यास केल्यानंतर वेबरने वकिली सूरू केली. 1888 मध्ये ‘हिस्ट्रो ऑफ कमर्शियल सोसायटीज इन द मिडल एजेस’ हा प्रबंध ‘पीएच.डी.’ च्या पदवीसाठी त्याने सादर केला. 1891 मध्ये ‘रोमन अग्रेरिअन हिस्ट्रो’ हा संशोधनपर ग्रंथ वेबरने पोस्ट डॉक्टरेटसाठी लिहीला.

1918 ते 1920 च्या दरम्यान वेबरने राजकीय कार्यक्रमात सहभाग घेतला. याच काळात त्याने वृत्तपत्रात जर्मनीतील राजकीय घडामोडींवर लेख, निबंध आणि अनेक निवेदने प्रसिध्द केली होती. ‘डच डेमोक्रॅटिक’ या पदाचा तो संस्थापक सदस्य होता. 14 जून 1920 ला न्युमोनियाच्या आजारातच मॅक्स वेबरचे निधन झाले.

**सामाजिक कियेचा सिध्दांत**

मॅक्स वेबरच्या समाजशास्त्रीय विचारांमध्ये सामाजिक क्रियेच्या सिध्दांतास विशेष महत्त्वाचे स्थान आहे. वेबरने सामाजिक क्रियेच्या सिध्दांतास आपल्या चिंतनाचा मुळ आधार मानला होता. वेबरच्या मते, ‘प्रत्येक व्यक्ती आपल्या आवश्यकतांची पूर्ती करण्याच्या उद्‌देशाने कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कार्य करीत असते. अशाप्रकारे व्यक्तीद्वारे करण्यात आलेले कोणत्याही प्रकारचे कार्य म्हणजेच क्रिया होय’

**सामाजिक कियेची व्याख्या :–**

वेबरच्या मते,”कोणत्याही क्रियेस आपण तेव्हाच सामाजिक क्रिया म्हणू की, जेव्हा ती क्रिया करणाऱ्या व्यक्तीद्वारे लावल्या गेलेल्या व्यक्तीनिष्ठ अर्थाच्या आधारावर या क्रियामध्ये इतर व्यक्तींचे व्यवहार आणि क्रियांचा समावेश असेल आणि त्यांच्यानुसार त्यांची गतिविधी निर्धारीत झाली असेल”.

सोप्या शब्दामध्ये या व्याख्येचा अर्थ स्पष्ट करता येईल. ‘त्या क्रियेस तेव्हाच सामाजिक क्रिया म्हणता येईल जेव्हा क्रिया करणारा दुसऱ्याची क्रिया किंवा व्यवहारास

लक्षात घेऊन आपली क्रिया किंवा व्यवहारात परिवर्तन करतो' म्हणजेच ज्यावेळी व्यक्ती दुसऱ्याच्या क्रिया किंवा व्यवहाराने प्रभावित होऊन आपल्या क्रिया किंवा व्यवहाराची दिशा निर्धारीत करीत असतो, त्यावेळी ती सामाजिक क्रिया होते.

**<u>सामाजिक कियेची वैशिष्टये:—</u>**

1. समाजिक क्रिया ही भूत, वर्तमान आणि भविष्य काळातील कियेने प्रभावित असावी—

   वेबरच्या मते, ' सामाजिक क्रिया ही दुसऱ्या व्यक्तींच्या भूतकाळ, वर्तमानकाळ किंवा भविष्यकाळातील व्यवहाराद्वारे प्रभावित असू शकते ' उदा. जर एक व्यक्ती दुसऱ्या कोणत्या व्यक्तीच्या मागील सूडाचा बदला घेण्याच्या भावनेने आक्रमण करीत असेल तर ती सामाजिक क्रिया होय. कारण ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या भूतकाळातील कोणत्या तरी कियेने प्रभावित होऊन सूड घेण्याच्या भावनेने क्रिया करते.

2. प्रत्येक प्रकारची क्रिया सामाजिक क्रिया नाही:—

   वेबरने स्पष्ट केले की, 'व्यक्तीची प्रत्येक क्रिया ही सामाजिक क्रिया असू शकेलच असे नाही.' इतकेच नव्हे तर प्रकट क्रिया या जर सामाजिक क्रिया नाही. प्रकट क्रिया या जर कोणत्या तरी निर्जिव वस्तूच्या दिशेने निर्देशित होत असतील तर त्या क्रिया सामाजिक क्रिया नाहीत. कारण या सामाजिक क्रिया नसतात. उदा.— एक व्यक्ती रस्त्याने जात असतांना एखादा वृक्ष मध्ये आला तर ती व्यक्ती आपला रस्ता बदलविते. ही क्रिया सामाजिक क्रिया नाही. कारण त्या व्यक्तीची क्रिया ही निर्जिव वस्तूद्वारा निर्देशित झाली आहे.

3. प्रत्येक मानव संपर्क सामाजिक क्रिया नाही :—

   मानवाच्या सर्व व्यवहारात सामाजिकता असते असे म्हणता येत नाही. वेबरच्या मत, 'मानवाचा प्रत्येक संपर्क हा सामाजिक स्वरूपाचा नसतो. जेव्हा मानवी संपर्क आल्यानंतर क्रिया करणाऱ्या व्यक्तीचा व्यवहार हा दुसऱ्याच्या व्यवहारांशी अर्थपूर्ण पध्दतीने संबंधित आणि प्रभावित होतो तेव्हाच त्या कियांना सामाजिक क्रिया म्हणता येईल.

   उदा.— एका मूलाच्या सायकलची टक्कर मूलीच्या सायकलशी झाली आणि दोघेही खाली पडले. परंतु त्या दोघांनी आप—आपल्या सायकली उचलल्या आणि निमूटपणे चालले गेले. तर त्या कियेला सामाजिक क्रिया म्हणता येणार नाही. परंतु समजा मूलाच्या सायकलची ठोस मुलीच्या सायकलशी झाल्यानंतर त्या दोघांमध्ये भांडण झाले. तर मात्र ती सामाजिक क्रिया होईल. कारण ती क्रिया एक—दुसऱ्यांच्या व्यवहाराने प्रभावित झाली असेल.

4. अनेक व्यक्तीद्वारा एकसारख्या होणाऱ्या क्रिया सामाजिक क्रिया नाही.:—

   वेबर म्हणतो की, ' अनेक व्यक्तीद्वारा होणाऱ्या एकसारख्या क्रिया सामाजिक

क्रिया नाही. म्हणजेच एकाच वेळी अनेक व्यक्ती सारख्या क्रिया करीत असतील तरी त्या क्रिया सामाजिक क्रिया असतीलच असे नाही. अनेक व्यक्तीच्या क्रिया सारख्या असल्या, परंतु त्या क्रिया अन्य व्यक्तींच्या क्रियाद्वारे प्रभावित नसतील तर व्यक्तीकडून घडणाऱ्या अशा एकसारख्या क्रिया सामाजिक क्रिया नाही.

उदा.– पाऊस सुरू झाल्याबरोबर अनेक व्यक्ती आपल्या छत्र्या उघडतात. परंतु ही सामाजिक क्रिया नाही ही इतर व्यक्तींच्या क्रियेद्वारे प्रभावित होणारी क्रिया नाही. तर पाऊस आल्यामुळे अनेक व्यक्तींनी पावसात ओले होऊ नये याकरीता आपआपल्या छत्र्या उघडल्यात म्हणजे छत्र्या उघडण्याची क्रिया अनेक व्यक्तीद्वारे एकाच वेळी घडून आली तरी या क्रियेमध्ये एकमेकांचा संबंध येत नाही.

पुढे वेबर स्पष्ट करतो की, एक दुसऱ्याचे अनुकरण म्हणजे सामाजिक क्रिया नाही जोपर्यंत ज्याचे आपण अनुकरण करतो त्या व्यक्तीशी ती क्रिया अर्थपूर्ण संबंध ठेवत नाही तसेच प्रभावित होत नाही. तोपर्यंत केवळ अनुकरण ही सामाजिक क्रिया होऊ शकणार नाही.

**<u>सामाजिक क्रियेचे प्रकार :–</u>**

वेबरने सामाजिक क्रियेचे चार प्रकार पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत :–

1. तर्कसंगत किंवा उद्‌दीष्टाभिमुख क्रिया :–

   जेव्हा व्यक्ती जाणीवपुर्वक आपली उद्‌दीष्टये आणि ती उद्‌दीष्टये साध्य करण्यासाठी उपलब्ध असणारी साधणे या दोहोमध्ये योग्य असा मेळ घालते तेव्हा व्यक्तीच्या त्या क्रियेला तर्कसंगत किंवा उद्‌दीष्टाभिमुख क्रिया असे म्हणतात. तर्कसंगत क्रिया करणाऱ्या कर्त्याला आपल्या ध्येयाची वा उद्‌दीष्टांची स्पष्ट कल्पना असते. ती उद्‌दीष्टे साध्य करण्यासाठी कोणकोणते मार्ग उपलब्ध आहेत याचा सारासार विचार करून कर्ता आपली क्रिया करीत असतो. म्हणून त्याने केलेली क्रिया ही तर्कसंगत आहे असे म्हणता येते.

2. मुख्यात्मक क्रिया :–

   जे वर्तन कोणत्याही प्रकारचे संयुक्तिक कारण न देता केवळ धार्मिक, नैतिक अथवा सौंदर्यात्मक आधारावर केले जाते आणि इतराकंडून स्वीकारले जाते अशा वर्तनाला किंवा क्रियांना मुल्यात्मक असे संबोधिले जाते. वेबरच्या मते मुल्यात्मक शिष्टाचाराला धरूण आपण क्रिया करतो. कारण काही व्यक्ती धार्मिक किंवा नैतिक आदर्श टिकविण्यासाठी आपल्याकडून अशा प्रकारच्या शिष्टाचारयुक्त वर्तनाची अपेक्षा करतात. अशा क्रियांमध्ये अंतिम मुल्यासंबंधीचे प्रश्न विचारले जात नाही तर त्या क्रिया मान्य केल्या जातात.

3. भावनात्मक क्रिया :–

भावनात्मक अभिव्यक्ती ज्या वर्तनातून होते, ते भावनात्मक वर्तन होय. अनेकदा व्यक्ती उद्वेग किंवा भावनांच्या आहारी जाऊन वर्तन करतो. या क्रियेमागे कोणतीही तार्किकता नसते किंवा कोणत्याही प्रकारचे मुल्यांकन केले जात नाही. काम, क्रोध, मोह, प्रेम, शत्रूता इत्यादी भावनांनी प्रेरीत होऊन जी क्रिया केली जाते, त्या क्रियेला भावनात्मक क्रिया म्हंटले जाते.

4. परंपरात्मक क्रिया :–

ज्या क्रिया या केवळ प्रथा, रूढी, चालीरिती इत्यादी परंपरागत आधारावर केल्या जातात अशा क्रियांना परंपरात्मक क्रिया म्हणतात. परंपरात्मक क्रियांमध्ये तर्काला कोणतेच महत्त्व नसते. या क्रिया याकरीता केल्या जातात. की, इतर लोक परंपरांना अनुसरून क्रिया करतात. अनेकदा या क्रिया करण्याकरीता व्यक्तीवर दबाव देखील येत असतो. थोडक्यात प्रथा–परंपरांना अनुसरून करण्यात आलेल्या क्रियांना परंपरात्मक क्रिंया असे म्हणतात.

अशाप्रकारे वेबरने सामाजिक क्रियाचे उद्दीष्टाभिमूख तार्किक क्रिया, मुल्याभिमुख तार्किक क्रिया, भावनात्मक क्रिया आणि परंपरात्मक क्रिया असे चार प्रकार विषद केले आहेत.

**<u>क्रियेच्या उत्पत्तीच्या पध्दती</u>** –

वेबरच्या मते, 'क्रिया केवळ निश्चित उद्देशाच्या दिशेने घडून येते असे नाही, तर एका निश्चित सामाजिक प्रणालीच्या एका व्यवस्थेच्या दिशेने सुध्दा क्रिया नेत असतात.' म्हणजे क्रिया या सामाजिक प्रणालीच्या एका व्यवस्थेतचा निर्देश करीत असतात. याकरीता वेबरने क्रियेच्या उत्पत्तीच्या तीन पध्दती सांगितल्या आहेत.

1. अभिरूची :–

अभिरूचीमध्ये क्रियेचा आरंभ हा बौध्दीक असतो. अभिरूचीच्या संदर्भात वेबर म्हणतो की, या अवस्थेमध्ये क्रिया ही कर्त्याच्या अभिरूची द्वारा निर्धारीत होते. यामध्ये निश्चित उद्देश आणि साधनाचा उपयोग केला जातो.

2. परंपरा :–

परंपरेच्या अवस्थेमध्ये क्रियेचा आरंभ सामाजिक परंपराद्वारा होत असतो. परपराचे अनुकरण यासाठी केले जाते की, भूतकाळापासून लोक त्या परंपरांचे अनुकरण करीत आले आहेत. म्हणून व्यक्ती परंपरांच्या अनुषंगाने क्रिया करतात.

3. वैध व्यवस्था :–

वेबरच्या मते, ' आर्थिक क्रिया या सत्तेचा शांतपूर्ण प्रयोग आहे ज्यांचा आरंभ मुलभूत रूपाने आर्थिक असतो.' वेबर प्रत्येक क्रियाकरीता एक विधी मानतो जे

क्रियाचे एक तत्व आहे. परंतु वेबर वैधतेला मूळ रूपात एक आवश्यक प्रतिमान म्हणून स्वीकारतो.

**<u>वेबरच्या सामाजिक क्रिया सिध्दांताचे टीकात्मक परीक्षण :–</u>**

1. टीकाकारांच्या मते कोणकोणत्या क्रिया हया सामाजिक क्रिया नाहीत याचे सविस्तर विवेचन वेबरने केले आहे. परंतु कोणती क्रिया सामाजिक क्रिया आहे याचे फारसे सखोल स्पष्टीकरण केले नाही. वेबरचा क्रिया सिध्दांत हा नकारात्मक विश्लेषणावर अधिक भर देणारा आहे असे टीकाकारांचे म्हणणे आहे.
2. मॅक्स वेबरने सामाजिक क्रियेचे जे चार प्रकार सांगितले ते उचित वा योग्य नाही. त्यातील तीन प्रकार योग्य आहेत. कारण तार्किक, संवेगात्मक आणि परंपरागत अशा तीनच प्रमुख प्रेरणा आहेत. मुल्यात्मक सामाजिक क्रिया हा प्रकारच अयोग्य आहे कारण त्या सामाजिक क्रियेचा प्रेरणास्त्रोत कोणता हे स्पष्ट होत नाही असा टीकाकारांचा आक्षेप आहे.
3. एकाच घटनेचा अनेक कर्ते आपआपल्या मतानूसार अर्थ काढतात. म्हणून वेबरचा हा सिध्दांत वस्तूनिष्ठ नसून आत्मनिष्ठ आहे असे टीकाकारांना वाटते.

टीकाकारांच्या आक्षेपात सत्यांश ओढ असे क्षणभर मान्य केले तरीही त्यामुळे या सिध्दांताचे समाजशास्त्रातील महत्त्व कमी होत नाही.

**प्रा. निलिमा उमाटे**
**समाजशास्त्र विभाग**